www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दै.युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १५७ वा शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# शेतकऱ्यांना ईकेवायसी करणे बंधनकारक

**मराठवाडा विभागीय प्रतिनिधी प्रमुख :-राजु शिंदे :** मंठा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना शासनाव्दारे वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीसाठी (अवकाळी पाऊस /अतिवृष्टी / अवर्षण / दुष्काळ इ.) निविष्ठा अनुदानाच्या स्वरुपात मदत जाहीर करण्यात येत असते. तालुक्यात सन २०२१ ते २०२४ या कालावधीत मोठ्या प्रमाणात अवेळी पाऊस/गारपीट/अतीवृष्टी व वादळी वारे यामूळे शेतकरी यांच्या शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामूळे शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे शेतीपिकांसाठी अनुदान मंजूर झाले असून सदर अनुदान ई पंचनामा (e panchnama) पोर्टलब्दारे E-KYC पूर्ण केल्यानंतर शेतक-यांच्या खात्यात वाटप करण्यात येते. परंतू आज अडीच ते तीन वर्षांचा कालवधी होवून देखील ५९१९ पेक्षा अधिक ई केवायसी (EKYC) प्रलंबीत असल्याचे दिसून येते. ज्यामुळे शेतक-यांना मुदतीत अनुदानाचे वाटप होत नाही. सदर प्रलंबित ई केवायसी (E-KYC) १००% पूर्ण होणे आवश्यक आहे. जेणेकरुन संबधीत शेतकरी यांना अनुदान वितरीत होण्यास सुलभ होईल. त्या अनुषंगाने मंठा तालुक्यातील सर्व शेतकरी यांना आवाहन करण्यात येते की, तहसिल कार्यालयाकडून सर्व महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र तसेच सेतू सुविधा केंद्र यांना तालुक्यातील E KYC Pending असणा-या शेतक-यांची बादी पुरविण्यात आलेली असून स्थानिक स्तरावरील कर्मचारी यांना गावामध्ये चावडीवर यादी चिटकवून, दवंडी देऊन, मौखिक तसेच Whatsapp Group व्दारे माहिती प्रसारीत करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच तहसिल कार्यालयाने गावनिहाय E-KYC पूर्ण करण्यासाठी तलाठी/ग्रामसेवक यांना गावातील ग्रामपंचायत स्तरावर कॅम्प आयोजित करुन E-KYC प्रलंबीत राहिलेल्या शेतक-यांकडून कॅम्प मध्ये उपस्थित राहून केवासी (E KYC) पूर्ण करून घेण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. तरी शेतक-यांनी आपल्या नजीकच्या महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन EKYC पूर्ण करुन घ्यावी, जर संबधीत शेतकरी यांनी विहित मुदतीत E-KYC पूर्ण केली नाही व त्यामुळे तो अनुदानापासून वंचित राहिल्यास त्यास सर्वस्वी सदर शेतकरी जबाबदार राहिल. तरी सर्व शेतकरी बांधवांनी तात्काळ प्रलंबित E KYC पूर्ण करावी व शासनास सहकार्य करावे असे तहसिलदार मंठा यांनी आवाहन केले आहे.



# भारताची विजयी सलामी!

## बांगलादेशचा दणदणीत पराभव शमी आणि गिल ठरले विजयाचे शिल्पकार

आयसीसी चॅम्पिअन्स ट्रॉफी 2025 मध्ये भारताने विजयी सलामी दिली आहे. भारताने पहिल्या सामन्यात बांगलादेशचा 6 गडी राखून पराभव केला आहे. बांगलादेशने टॉस जिंकल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत 229 धावांचं आव्हान दिलं होतं. भारताने 46.3 ओव्हर्समध्ये हा सामना जिंकत विजयी सुरुवात केली आहे. 5 विकेट्स घेणारा मोहम्मद शमी आणि संयमी फलंदाजी करणारा शुभमन गिल विजयाचे खरे शिल्पकार ठरले. दरम्यान आता भारतीय संघाचा पुढील सामना पाकिस्तानशी होणार आहे. 23 फेब्रुवारीला दोन्ही संघ भिडणार आहेत.

बांगलादेश संघाने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर तो अयोग्य ठरत होता. याचं कारण त्यांनी सुरुवातीच्या ओव्हर्समध्ये आघाडीचे फलंदाज गमावले. त्यांची स्थिती 15 ओव्हर्समध्ये 62 वर 5 विकेट्स अशी होती. पण तोहिद हृदोय आणि झाकेर अली यांच्या भागीदारीने बांगलादेश संघाला तारलं. तोहिद हृदोयने



शतक ठोकलं. यानंतर पुन्हा विकेट्स पडू लागल्या आणि सर्व संघ बाद झाला. भारतासमोर 229 धावांचं आव्हान उभं करण्यात आलं होतं. भारताकडून मोहम्मद शमीने सर्वाधिक 5 विकेट्स घेतल्या. रोहित शर्माने झेल सोडल्याने अक्षर पटेलची हॅटट्रीक हुकली. आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाने आक्रमक सुरुवात केली होती. रोहित शर्मा 41 धावा करुन बाद झाला. यानंतर विराट कोहली 22, त्यापाठोपाठ श्रेयस आणि अक्षर पटेलनेही विकेट गमावल्या. पण दुसरीकडे शुभमन गिल संयमी खेळी करत होता. त्याने आपलं शतकही पूर्ण केलं. के एल राहुलसह त्याने विजयी भागीदारी केली. शुभमन गिल 101 धावांवर नाबाद राहिला.

**भारतीचा प्लेईंग 11 -**रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (विकेटकिपर), हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, रवींद्र जडेजा, हर्षित राणा, मोहम्मद शमी, कुलदीप यादव

**बांगलादेशची प्लेईंग 11 -** तन्झीद हसन, सौम्या सरकार, नजमुल हुसेन शांतो (कर्णधार), तौहीद हृदोय, मुशफिकुर रहीम (विकेटकिपर), मेहदी हसन मिराझ, जाकेर अली, रिशाद हुसेन, तन्झिम हसन साकिब, तस्किन अहमद, मुस्तफिजुर रहमान.

# शनी शिंगणापूर देवस्थानच्या वतीने शिवाजी महाराज यांची जयंती उस्ताहात साजरी



**दैनिक युवक आधार**
**(नेवासा प्रतिनिधी:- लखन वाल्हेकर)**
नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र शनी शिंगणापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी सर्व देवस्थानचे कर्मचारी तसेच देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर, उपाध्यक्ष विकास बानकर ,कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ दरंदले, उप कार्यकारी अधिकारी नितीन शेटे , जामदार साहेब , वाबळे साहेब, देविदास शेटे साहेब आस्थापना विभाग व सर्व देवस्थान चे विभाग प्रमुख कर्मचारी व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# शिवराजे उत्सव समितीतर्फे पालोद येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-योगेश पालोदकर/सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवराजे उत्सव समितीतर्फे शिवजयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली.



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करताना पालोद येथील शिवभक्तांचा प्रचंड प्रतिसाद पाहायला मिळाला. विशेषतः भव्य अशा शोभायात्रेने संपूर्ण पालोद भगवेमय झाले होते.पालोदवस्ती येथील गणपती मंदिरापासून निघालेली शिवजयंती शोभायात्रा मारुती मंदिराजवळ उत्साहात पोहोचली. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी आसमंत दणाणून गेला. भगवे फेटे व पोशाख परिधान केलेले मावळे आणि उत्साहाने भरलेली गर्दी यामुळे पालोद येथे शिवजयंती सोहळा अधिक भव्य स्वरूपात पार पडला. मारुती मंदिराजवळ पोहोचल्यावर शिवपूजन व महाआरती करण्यात आली. विशेषतः सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी यावेळी चोख असा बंदोबस्त ठेवला होता.

# नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिवजयंती मोठया उत्साहात साजरी






**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती व उरणचे शिल्पकार नगराज शेठ यांच्या जयंतीचे औचित्य साधून नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल-उरण मध्ये शिवजयंती सोहळा व नगराज शेठ यांच्या जयंती निमित्ताने चित्रकला स्पर्धांचे आयोजन शालेय विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते.उरण तालुका मर्यादित असणाऱ्या या चित्रला स्पर्ध्येत परिसरांतील विद्यालयांतील विध्यार्थ्यानी मोठा सहभाग दर्शविला होता.सुमारे 250 पेक्षा अधिक विद्यार्थी या स्पर्ध्येत सामील झाले होते.शिवजयंती सोहळा व चित्रकला स्पर्धांचे उद्‌घाटन नुकत्याच नवी मुंबईत पार पडलेल्या नवी मुंबई सुंदरी स्पर्ध्येत प्रथम क्रमांकाने “मिस टीन नवी मुंबईचा”किताब पटकाविणाऱ्या कु.काव्या म्हात्रे हिच्या हस्ते श्री गणेशाच्या प्रतिमेस पुष्पहार घालून तर संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून व छत्रपती शिवाजी महाराजयांना पुष्पहार घालून करण्यात आला यावेळी त्यांच्या समवेत स्कूलचे व्यवस्थापक प्रदीप पाटील,स्कूलच्या प्रिन्सिपॉल सौ.ज्योती म्हात्रे,साई संस्थेचे सदस्य नितीनजी गुप्ता,कराटे प्रशिक्षक वैभव रहाटे कु.काव्याचे आई सौ.तृप्ती म्हात्रे वडील हिमांशू म्हात्रे उपस्थित होते.

यावेळी नरसू पाटील सरांनी उपस्थित स्पर्धकांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या व महाराज्यानी प्रतिकूल परिस्थितीत संस्थापित केलेल्या हिंदवी स्वराज्य स्थापनेची माहिती सांगून आपण सर्वानीच महाराज्यांकडू त्या गोष्टीची शिकवण घेतली पाहिजे,असे त्यांनी सांगितले. नगराज शेठ यांची जयंती दोन दिवस अगोदरच असली तरी चित्रकलास्पर्ध्येत विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात सहभाग घेता यावा यासाठी या स्पर्धा शिवजयंतीचे औचित्य साधून या चित्रकला स्पर्धांचे कौशल्यपूर्ण आयोजन विद्यालयाच्या व्यवस्थापनांनी केले असल्याने परिणामी आजची स्पर्धकांची संख्यापाहून त्यासर्वांचे मी कौतुक करतोअसे ते म्हणाले.

तर स्पर्ध्येच्या उद्‌घाटनकर्त्या “मिस टीन नवी मुंबई किताब पटकाविणाऱ्या कु.काव्या हीने सर्वांना शुभेच्छा देत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात माहिती दिली. आपण शिवरायांच्या विचाराने वागलो तर खऱ्याअर्थाने महाराज्याना तो मनाचा मुजरा असेल असे ती म्हणाली,व इतक्या मोठया चित्रकलास्पर्ध्येचे आयोजन मी प्रथमच पाहत असून मलाही स्पर्ध्येमध्ये सहभाग घेण्याचा मोह झाल्याचे तिने सांगितले कारण मीही तुमच्या प्रमाणे शाळेत जाणारी विद्यार्थिनी आहे.महाराज्यांचे विचार आचार जिद्द हे गुण आपण अंगिकारले पाहिजेत तरच खऱ्याअर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांना तो मनाचा मुजरा ठरेल असे तीने शेवटी सांगून स्पर्धांचे उद्‌घाटन झाल्याचे जाहीर केल.

यावेळी विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी पोवाडे व शिवचरित्रावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.तर सौ.दिव्ययांनी मॅडम, सौ.रेणू मॅडम, कु,अंकिता मॅडम यांनी मराठी,हिंदी आणि इंग्रजींतून महाराज्यांच्या कार्याचा इतिहास सादर केला. सर्व स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.लवकरच या स्पर्ध्येमधील विजेत्यांची नवे जाहीर करण्यात येतील व पारीतोषकाचे वितरण करण्यात येईल असे आयोजकांनी कळविले आहे .हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी विद्यालयाच्या सर्व शिक्षिकवृंद,शिक्षिकेतर कर्मचारीयांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सुकापुर गड शिवमुद्रा प्रतिष्ठान तर्फे शिवजन्मोत्सव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सुकापुर गड शिवमुद्रा प्रतिष्ठान च्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा ( "जगात भारी 19 फेब्रुवारी " वर्ष 4 थे ) मोठ्या उत्साहात संपन्न झाला शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे, किरण गावडे विभागीय अध्यक्ष नवीन पनवेल ,राज क्षिरसागर विभागीय अध्यक्ष सुकापुर , जयवंत बाबरे सुकापुर शाखा अध्यक्ष, तसेच मनसे कार्यकर्ते विक्रम चव्हाण , योगेश जगताप, संजय मुंढे, सुमित कदम , संतोष गायकवाड ,केतन माने, हेमंत मेदाढकर ,नितीन मेदाढकर ,समाधान राठोड , किसन नाईक,असे अनेक मनसे कार्यकर्ते,यांच्या प्रयत्नाने शिवजन्मोस्तव मोठ्या उत्साहात साजरा झाला, तसेच अतिशय सुंदर असे डेकोरेशन हे शिवमुद्रा प्रतिष्ठान यांचे सदस्य साई चव्हाण यांनी केले होते , तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जयवंत गणपत बाबरे मनसे शाखाअध्यक्ष सुकापुर, यांनी महिलांसाठी ५१ पैठणी साड्यांचे लकी ड्रॉ ठेवले होते, यामध्ये प्रथम पैठणी दार सुरुवात सौ: रोजमॅरी संतोष जितेकर, या झाल्या, त्यानंतर ५० पैठणी दार महिला ठरल्या, तसेच शिवमुद्रा प्रतिष्ठान तर्फे अन्नदानाचे सुद्धा नियोजन करण्यात आले होते, तसेच या शिवजयंती जन्मोत्सव च्या सोहळ्याला पाच ते सहा हजार शिवप्रेमी यांनी दर्शन घेऊन. उपस्थिती दिली, तसेच या वेळी प्रमुख उपस्थिती, अड: मनोज भुजबळ साहेब नगरसेवक, रामदास भाई पाटील मनसे पनवेल तालुका अध्यक्ष विजय भाई पवार आरपीआय पनवेल तालुका अध्यक्ष ,संतोष जी आमले मुख्य संपादक दैनिक युवक आधार,, विलास गायकवाड उपसंपादक, सुरेश भोईर कार्यकारी संपादक, विजय दुंदरेकर कोकण विभाग पत्रकार प्रमुख , , संतोष जितेकर, गौरव दुधे उद्योगपती, पीएसआय मामुनकर , प्रमोद भगत उद्योगपती, अड :चेतन केणी, आत्माराम पाटील, विजय बाबरे उद्योगपती, चेतन म्हात्रे, पीएसआय रमाकांत जाधव , व अनेक महिला यांनी चांगल्या प्रकारे उपस्थित देऊन दर्शनाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवळी असे अनेक मान्यवरांनी उपस्थिती देऊन त्यांचे सत्कार करून कार्यक्रमाची शोभा वाढवली,









# महाराष्ट्र पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची निवड

## बीड जिल्हा पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी आष्टी येथील जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच बीड जिल्हा शाखेने जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दिपक जाधव यांची तर बीड शहर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त तालुकाध्यक्ष यांनी तत्काळ नवीन सभासद नोंदणी करून तालुकास्तरीय उर्वरित कार्यकारिणी जाहीर करावी असे ही कळविण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे. नवनियुक्त तालुकाध्यक्ष पुढील प्रमाणे बीड- धनंजय गुंदेकर, परळी- बालासाहेब फड, अंबाजोगाई- गोविंद महाराज केंद्रे, केज- दुर्गादास लांब, आष्टी- प्रविण पोकळे, धारूर- परमेश्वर राऊत, पाटोदा- महेश बेदरे, शिरूर- शहेबाज पठाण, माजलगाव- अंगद दराडे, गेवराई- राहुल लोंढे, वडवणी- दत्ता कराड यांचा समावेश आहे. तसेच बीड शहर अध्यक्षपदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना प्रभारी करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे प्रदेश उपाध्यक्ष या रिक्त पदी आष्टी चे ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपल्या तालुक्यात आणि शहरात नवीन सभासद नोंदणी करून स्थानिक कार्यकारिणी जाहीर करावी. असे जिल्हा संघाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

=========================

# शेतकरी : सोन्याच्या शोधात हिरा गमावला



गिरमाजी सुर्यकार

इंग्रजीमध्ये एक म्हण आहे in the search of Gold we lost diamond म्हणजे सोने शोधताना आपल्या जवळील हिरा हरवून बसलो. हे शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक परिस्थिती साठी अत्यंत छान उदाहरण आहे. कसे ते पाहू.

**दुसरी हरित क्रांती ?**

शेताच्या बांधांवर आंबा, चिंच, जांभूळ विहिरींभोवती रामफळ, बेल, पिंपळ. ओढ्यांच्या काठांवर उंबर, गोंदण, भोकर. माळरान-गायरानात आवळा, बोर, बाभूळ, एकदोन नगदी पिकं, ज्वारी-बाजरी-पिवळी यांच्याबरोबर तेलबिया-डाळी आणि इतर अनेक वरकड धानांनी युक्त हिरवीगार शेतं.

मानवप्राणी, पाळीवप्राणी आणि निसर्गातील इतर सर्व प्राण्यांना जे जे हवं ते ते सारं उपलब्ध. स्वप्नवत वाटावं असं हे वर्णन आहे. साठ-एक वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातील स्वयंपूर्ण खेड्यांचं. प्रत्येक शेतक-याच्या घरी किमान दहा-पंधरा प्रकारची अन्नधान्ये कमी अधिक प्रमाणात वर्षभर उपलब्ध असायची. उतरंडीच्या डे-यांत गुळ, पाक असायचा. पैसा फारसा कुणाकडे नसायचा. सारा व्यवहार धान्याच्या देवाण-घेवाणीतूनच चालायचा. नगदी पीक म्हणून पस-या भूईमुग. पुढे आल्यानंतर कापसाची खांदेश मराठवाड्यातून पीछेहाट झाली.

श्रावणी पोळ्याला चार पैसे हातात यावेत म्हणून उडीद-मुगाचे पीकही ब-यापैकी घेतले जायचे. भूईमुगाचे पीक एवढ़या मोठ्या प्रमाणावर घेतले जायचे की, मजुरांच्या घरातही पोतं-दोनपोती शेंगा वर्षभर असायच्या. प्रत्येक कालवणात शेंगदाण्याचे कुट आणि जेवताना टोपलंभर भाजलेल्या शेंगा, ही मराठी पंक्तींची खासीयत.

**अर्थात त्यावेळची !**

कुटुंबाला वर्षभर पुरेल इतकी ज्वारी आणि इतर धान्य; जनावरांसाठी पेंड-कडबा. कुटुंबाला वर्षातून दोनदा नवीन कापडं घेता यावीत ही मराठी शेतक-याची माफक अपेक्षा असायची. म्हणूनच कदाचित आम्ही आजच्यापेक्षा त्यावेळी अधिक सुखी, समाधानी होतो.१९७२ च्या भीषण दुष्काळाने महाराष्ट्राचे होत्याचे नव्हते करुन टाकले. पश्चिमेकडून आलेल्या वा-यांमुळे गावं आणि शिवारंही बदलू लागली. खाण्या-पिण्याच्या आणि पीकपाण्याच्या सवयी बदलू लागल्या. अधिक उत्पादन देणा-या संकरीत ज्वारीने पस-या भूईमुग हळूहळू हद्दपार केला.प्रथमच गावरान ज्वारीच्या लागवडी खालील क्षेत्र झपाट्याने वाढू लागले. संकरीत ज्वारीच्या भाकरीने भूक भागायची आणि तिच्या कडब्याला जनावरं पोट भर खायची. घरी पोटभर भाकरी खाऊन शेतात जाईपर्यंत परत भूक लागायची.गोधन-पशूधन कमी होऊ लागले. स्वतः तयार केलेले गावरान बी-बियाणे आणि शेणखत वापरणारा बळीराजा संकरीत बी-बियाने आणि रासायनिक खतांसाठी लाचार, परावलंबी होत गेला.एकदा संकरीत तुरीच्या बियाणाने तर कमालच केली. तुरी पुरुषभर उंच वाढल्या परंतु त्याला शेंगा आल्याच नाहीत. गावरान तुर, अंबाडी, जवस, तीळ, वरई, करडई तर गायबच झाले. कपडे आणि दोरखंडही नायलॉनचेच. साखर कारखानदारी जसजशी वाढत गेली तसतसे अफाट पाणी पिणारा ऊस हातपाय पसरु लागला. परिसराला आणि अनेक लोकांच्या तोंडाला मळीची दुर्गंधी येऊ लागली. प्रतिष्ठेच्या, मोठेपणाच्या कल्पना बदलू लागल्या.संकरीत ज्वारी, जिला गावरान भाषेत 'हायब्रीड' म्हटले जायचे, जितक्या वेगात आली तितक्याच वेगात निघून गेली परंतु ती माणसांना आणि जनावरांना अशक्त करुन गेली.त्यानंतर सोयाबीन आले. त्याच्याबरोबर अनुदानही आले. जिकडे तिकडे सोयाबीन दिसू लागले. गावरान ज्वारी-बाजरी-पिवळी आधीच गायब झाली होती. आमटी-भाकरीची जागा पोळी-भाजीने घेतली. त्यासाठी गहु-तांदुळ परप्रांतांतून येऊ लागला. दहा-पंधरा प्रकारची पिके घेणा-या शेतक-याची शेती एकसुरी होऊ लागली. सोयाबीनचा स्थानिक पातळीवर खाद्य म्हणून उपयोग करता येत नाही. यापूर्वी घरात चार पोती ज्वारी असली की अडीअडचणीला त्याच्या कण्या करुन खाता येत असत. ज्वारीच्या जाण्याने तो आधार गेला. जमिनीच्या आणि तिच्या लेकरांच्या आहारातील सत्व आणि विविधता कमी होत गेली. रासायनिक खतांच्या सततच्या मा-यांमुळे मातीची जैविक संरचना बिघडली. शेणखताच्या अभावामुळे मातीची पाणी धारण क्षमता कमी होत गेली. एकसुरी पीक पद्धतीमुळे एकाच वेळी सगळं पीक वाया जाण्याचं किंवा अती उत्पादन झाल्यामुळे त्याचे बाजारभाव गडगडण्याचं प्रमाण वाढलं. साखर मुबलक पण तुरडाळ गायब, हे आजचे ज्वलंत उदाहरण आहे.यामुळे आणि बदललेल्या जीवनशैलीमुळे शेतकरी आत्महत्त्या करु लागला. मिळणा-या मदत, सवलतींसाठी शेतकरी आत्मसन्मान, आत्मविश्वास गमावून बसला. भाकड जनावरांबरोबरच म्हातारे आईबाप ही त्याला नकोसे वाटू लागले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर राजकारणाची अनिष्ट छाप पडू लागली. व्यसनं, मारामा-या, हेवे दावे यांनी सारा गाव पोखरुन काढला. शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागलं. लहरी निसर्ग आणि चतुर बाजार व्यवस्था यांच्या कात्रीत सापडलेला शेती व्यवसाय आतबट्ट्याचा व्यवहार ठरु लागला.शेतकरी काळी आई विकू लागला आणि राजकारणी, व्यापारी ती घेऊ लागले. शहरांकडे पलायन वाढलं. शेतमजूर मिळेनासे झाले. शेतक-यांविषयी इतरांना आत्मियता वाटेनाशी झाली.२९)हॉटेलच्या वेटरला १०० रुपये टीप देणा-याला ५० रुपये किलो कांदा महाग वाटू लागला.असो.झाडे गेली, ओढे कोरडे पडले, वन्यजीव परागंदा झाले. चिमण्यांच्या चिवचिवाटा ऐवजी डॉल्बीचा दणदणाट, राजकारण्यांची कावकाव आणि सा-यांचीच खावखाव, शेती भकास, शेतकरी उदास आणि इतर सारे बिनधास्त. अशा परिस्थितीत पंतप्रधानांनी दुस-या हरितक्रांतीची हाक दिली आहे.

**कुणासाठी आणि कशी असेल ही दुसरी हरित क्रांती ?**

शेतक-यांची पोरं शेतात जायला तयार नाहीत. दिवसभर पुढा-याच्या अवतीभवती फिरतात, ढाब्यावर जेवण करतात आणि मुक्कामाच्या गाडीने रात्री उशीरा घरी परततात.

**दुसरी हरित क्रांती कुणाच्या भरवशावर करणार ?**
**कोण करणार ?**
**भ्रष्ट नोकरशाही ?**
**दिशाहीन शिक्षणप्रणाली ?**
**भरकटलेली प्रसारमाध्यमे ?**
**निद्रिस्त समाज ?**

प्रत्येक नागरिकाला प्रत्येक वर्षी ठराविक कालावधीचे लष्करी आणि शेतकी प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. बेशिस्त आणि मातीशी नाळ तोडलेला समाज **कुठलीही क्रांती करु शकत नाही...???**

विचार करा आणि भानावर येऊन कृती करण्यासाठी ही माहिती इतर प्रयोगशील शेतकरी बांधवांपर्यंत पर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला मदत करा..

# शिवराज्याभिषेक"सोहळ्यातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुवर्णकाळाचा अनुभव





**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या "महाराष्ट्राची महासंस्कृती" या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या लोककला, लोकसंगीत, कोळीगीत, गणगवळणी, लावणी, पालखी, अभंग, पोवाडा, बहुरंगी संगीत आणि नृत्य रचनांनी मंत्रमुग्ध होतानाच विशेषतः यावेळी सादर झालेला "शिवराज्याभिषेक सोहळा" उपस्थितांना महाराजांच्या सुवर्णकाळाचा अनुभव देऊन गेला. त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीवर आधारित या मराठमोळ्या कलाविष्कारातून छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्यावतीने समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात आणि भव्य दिव्य स्वरूपात करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांची सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील,माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, समितीचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, समितीचे सरचिटणीस व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, वर्षा प्रशांत ठाकूर, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, वैभव देशमुख, भाजपचे खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष वसंतशेठ पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, व्ही.के. ठाकूर, रघुनाथ देशमुख, स्वप्नील ठाकूर, राज ठाकूर, पायलट प्राप्ती ठाकूर, कामगारनेते संजय भगत, विभागीय अध्यक्ष विजय घरत, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, वामन म्हात्रे, हेमंत ठाकूर, सि के ठाकूर, रघुनाथ ठाकूर, जयेश ठाकूर, स्नेहलता ठाकूर, कमलाकर देशमुख, सुहास भगत,किशोर पाटील, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, मदन पाटील, गणेश जगताप, शैलेश भगत, योगिता भगत, किशोर पाटील, यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

"शिवराज्याभिषेक सोहळा" हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सोहळा, जो ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर पार पडला. या ऐतिहासिक घटनेत महाराजांना छत्रपती म्हणून राज्याभिषेक करण्यात आले. त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित "महाराष्ट्राची महासंस्कृती" या कार्यक्रमात "शिवराज्याभिषेक सोहळा" सादर करण्यात आला. या सादरीकरणाद्वारे उपस्थितांना महाराजांच्या सुवर्णकाळाचा अनुभव देण्यात आला. महाराष्ट्राची महासंस्कृती ही अनेकविध परंपरा, इतिहास, कला, साहित्य, लोकजीवन आणि चालीरीतींनी समृद्ध आहे. संस्कृती विविधतेने नटलेली असून संतपरंपरा, लोककला आणि आधुनिक विचारसरणीचा प्रभाव कायम राहिला असून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा महाराष्ट्र पुढे नेत आहे, त्यामुळे त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचा प्रभाव महाराष्ट्रसह देश आणि परदेशातही कायम राहिला आहे. त्यामुळे शिवजयंतीच्या निमित्ताने झालेल्या रत्नकांत जगताप व सुभाष नकाशे प्रस्तुत "महाराष्ट्राची महासंस्कृती" या कार्यक्रमातून राज्याच्या गौरवशाली परंपरेचा आदर अधोरेखित होत होता. या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी पंचक्रोशीतील हजारो शिवप्रेमी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध सूत्रसंचालक स्मिता गव्हाणकर यांनी केले.

# शेगाव येथे श्री संत गजानन महाराज यांचा प्रकट दिन साजरा





**अमरावती विभागीय प्रतिनिधी:- संदीप मापारी (लोणार)** : श्री पूर्णव्दारे श्रींचा १४७ वा प्रगटदिन उत्सव दि.१३/०२/२०२५ ते दि.२०/०२/२०२५ पर्यंत धार्मिक प्रथा-परंपरेनुसार संपन्न. या उत्सवात दराराज ६.०० ते ६.४ काकडा, ७.०० ते ९.१५था भजन, स्थान ४.५ प्रवचन, ५.३० ते ६ हरिपाठ व शनिवार ८ ते १० श्रीहरी कीर्तन संपन्न झाले. सप्ताहात श्री ह.भ.प.अंत बुवा कानवडे, कळमुळा, श्री ह.भ.प. वासुदेव बुवा कोलंबीकर, नाय गाव., श्री ह.भ.प. प्रशांत बुवा ताकोते, सिरसोली, श्रीह.भ.प. अनंत बुवा बिडवे, बार्शी, श्रीह.भ.प. राम बुवाडे, जटांदूर, श्री ह.भ.प. मयुर बुवा बोडखे, श्री क्षेत्र देहु, श्री ह.भ.प. श्रीहरी बुवा वैष्णव, जालना, श्रीह.भ.प. श्रीराम बुवा ठाकूर, लातूर आदि कीर्तनकारांचे कीर्तन संपन्न झाले.

श्री महारूद्र स्वाहाकार यागास माघ वद्य १ ला प्रारंभ होवून माघ वद्य ७ ला सकाळी १० वाजता यागाची पुर्णाहूती झाली. तसेच 'श्रींच्या प्रागट्टया' निमित्य श्रीहरी कीर्तन होवून कार्यक्रम संपन्न झाला.

यावर्षी श्री प्रगटदिन उत्सवांत श्रींचे सेवेत १००१ दिंड्यांनी सहभाग घेतला. यापैकी नियमांची पूर्तता केलेल्या एकूण १०९ नविन दिंड्यांना १० टाळ, १ विणा, १ मृदंग, श्री ज्ञानेश्वरी, श्री तुकाराम गाथा, श्री एकनाथी भागवत असे संत वाङ्मय आणि श्री माऊली पताक वितरीत करण्यात आल्या, जुन्या दिंड्यांना भजनी साहित्य दुरूस्ती करीता नियमाप्रमाणे सानुग्रह अंशदान व इतर व्यवस्थेकरीता सहयोग देण्यात आला. तसेच उत्सवानिमित्य आलेल्या भजनी दिंड्यांमधील वारकऱ्यांची भोजन प्रसादाची व्यवस्था तसेच प्रथमोपचार केंद्राची सुविधा विसावा संकूल येथे करण्यात आली.तसेच उत्सव काळात श्री शेगांवसह श्री शाखा पंढरपूर, आळंदी, त्र्यंबकेश्वर, पंपासरोवर, ओंकारेश्वर, गिरडा अशा सर्व शाखांवर श्रींचा प्रगटदिन उत्सव संपन्न होऊन २,३०,००० भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले, अशारितीने श्री कृपेने वारकऱ्यांची व भाविकांची सेवा घडून आली आहे. असे श्री संस्थान तर्फे कळविण्यात आले.

====================

# श्री .मानकेश्वर वाचनालय निफाड येथे शिवजन्मोत्सव सोहळा संपन्न



**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक/विनोद गायकवाड** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजे पण वारसा हक्काने न मिळता कर्तुत्वाने मिळालेले आहे म्हणूनच ते खरे रयतेचे राजे आहेत असे प्रतिपादन सुहास सुरळीकर यांनी केले. श्री मानकेश्वर वाचनालयात आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त निमित्त ते बोलत होते.तत्पूर्वी वाचनालयाचे संचालक बाळासाहेब कर्डिले यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमाचे पूजन करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकात अध्यक्ष मधुकर शेलार यांनी सुमारे चारशे वर्षानंतरही महाराजांच्या कर्तुत्वाचे पोवाडे गायले जातात यातच त्यांचे मोठेपण आहे,असे सांगितले. या कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार,उपाध्यक्षा डॉ. सौ. मेघा जंगम, चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे,हिशोब तपासणीस दत्ता ऊगावकर, संचालक तन्वीर राजे,सुहास सुरळीकर, बाळासाहेब कर्डिले, राजेंद्र खालकर, सुनील चिखले, रघु भाऊ कुंदे,माजी संचालक अशोक पगारे, संजय घुमरे, दयानंद डगले,प्र. ग्रंथपाल नितीन बनसोडे सहाय्यक ग्रंथपाल विद्या बंद्रे ,नंदकुमार पुंड, अनिता इस्ते आदी उपस्थित होते

# भोकर मतदारसंघातील रोजगार मेळाव्यातून अशोक चव्हाणांचा पकड मजबूत करण्याचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर/नांदेड** -: विधानसभा निवडणुकीत भोकर मतदारसंघातून भाजपाच्या श्रीजया चव्हाण यांची दणदणीत विजय मिळवला. गेल्या अनेक वर्षापासून हा मतदारसंघ काँग्रेसचा पंरपरागत मतदारसंघ म्हणून ओळखला जात होता. श्रीजया चव्हाण यांच्या विजयाने चव्हाण कुटुंबातील तिसरी पिढी राजकारणात उतरली आहे. अशोक चव्हाण यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्यानंतर भोकरमध्ये पहिल्यांदाच कमळ उमलले आहे.अर्थात काँग्रेस सोडल्याचा राग आणि मतदरासंघात असलेले विरोधी वातावरण पाहता अशोक चव्हाण यांनी योग्य काळजी घेत श्रीजया चव्हाण यांना निवडून आणलेच. आता भोकर मतदारसंघात श्रीजया चव्हाण यांचे पाय घट्ट रोवण्यासाठी अशोक चव्हाण यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. पक्ष बदलला तरी भोकरवर असलेले आपले वर्चस्व कदापी कमी होणार नाही याची दक्षता अशोक चव्हाण यांच्याकडून घेतली जात आहे. यासाठीच विधानसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर चव्हाण यांनी बेरोजगारीच्या प्रश्नाला हात घातला.

उमेद अंतर्गत येत्या शनिवारी ता.22 भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्याच्या तयारीत अशोक चव्हाण आणि आमदार श्रीजया चव्हाण या दोघांनी सुरूवातीपासून लक्ष घातले. BJP विधानसभा निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान, श्रीजया चव्हाण यांनी भोकर मतदारसंघ व नांदेड जिल्ह्यातील बेरोजगारीचा प्रश्न प्राधान्याने सोडण्याचे वचन दिले होते. या वचनाच्या पूर्ततेच्या दिशेने या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून श्रीजया चव्हाण या पहिले पाऊल टाकत आहेत.

22 फेब्रुवारी रोजी अर्धापूर येथे आयोजित भव्य रोजगार मेळाव्यासंदर्भात जिल्ह्यात बैठका, नोंदणी अभियान मोठ्या प्रमाणात राबवण्यात येत आहे. सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना मोठ्या संख्येने या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे. सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर येथे सकाळी 9 वाजता हा रोजगार मेळावा होणार आहे. या मेळाव्यात महाराष्ट्रासह इतर राज्यांतील सुमारे 120 नामांकित कंपन्या विविध पदांसाठी भरती करणार आहेत. आमदार श्रीजया चव्हाण यांनी निवडणूक प्रचारादरम्यान सुशिक्षित तरुण-तरुणींसाठी विविध उपक्रम राबविण्याचे आश्वासन दिले होते. त्याअंतर्गत या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी अशोक चव्हाण यांच्यासह त्यांचे जिल्ह्यातील सगळे समर्थक कामाला लागले आहेत.



# उरण मतदार संघाची आमसभा 28 फेब्रुवारी रोजी; जनतेच्या समस्या मार्गी लागणार का?

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील** : उरण मतदार संघातील गेल्या पाच वर्षांपासून रखडलेली आमसभा अखेर28 फेब्रुवारी 2025 रोजी होणार आहे. जेएनपीटी मल्टिपर्पज हॉलमध्ये सकाळी ११ वाजता आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडणार आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षे जनतेच्या प्रतीक्षेत असलेल्या समस्यांवर चर्चा होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गेल्या पाच वर्षांत एकही आमसभा नाही !18 ऑगस्ट 2018 रोजी तत्कालीन आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आमसभेनंतर कोरोनामुळे पुढील सभा झालीच नाही. त्यानंतर संपूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ आमसभा न घेताच संपला. याचा फायदा घेत शासकीय अधिकारी वर्गाने आपल्या मनमानी कारभाराला व भ्रष्टाचाराला उत दिला, असा आरोप जनतेकडून होत आहे.

**उरणकरांच्या मुख्य समस्या – कुणी सोडवणार ?**

या आमसभेत तालुक्यातील प्रमुख प्रश्नांवर ठोस चर्चा होणे अपेक्षित आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सुसज्ज हॉस्पिटलची गरज, वाहतूक कोंडी आणि वाढते अपघात, बेरोजगारी आणि अनधिकृत बांधकामे, अनधिकृत कंटेनर यार्ड आणि अतिक्रमण, नादुरुस्त रस्ते आणि विजेचा लपंडाव, पाणीटंचाई आणि फेरीवाल्यांचा विळखा, शासकीय कार्यालयांतील कामांमध्ये भ्रष्टाचार आणि चिरीमिरीशिवाय कामे न होणे

**अधिकारी वर्ग जनतेला वाऱ्यावर सोडतोय ?**

गेल्या अनेक आमसभांमध्ये जनतेच्या समस्यांवर अधिकाऱ्यांकडून ठोस उपाययोजना झाल्याचे दिसले नाही. मुख्य अधिकारी गैरहजर राहतात आणि दुय्यम अधिकारी वेळ मारून नेतात. महत्त्वाच्या प्रश्नांवर गंभीर चर्चा न होता केवळ औपचारिकता म्हणून सभा पार पडते. यंदाच्या आमसभेसाठी प्रत्येक शासकीय विभागाचा जबाबदार अधिकारी हजर राहील, याची सक्ती करावी, अशी मागणी जनतेकडून होत आहे.

**यंदाची आमसभा केवळ औपचारिकता की ठोस निर्णय ?**

2025 मधील पहिली आमसभा असून, उरणकरांच्या अनेक वर्षांच्या प्रलंबित समस्यांचे निवारण यावेळी होते की पुन्हा फक्त चर्चाच होते, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.ही आमसभा याआधीच्या सभांप्रमाणे केवळ वेळ मारून नेणारी ठरणार, की अधिकारी खरोखर जबाबदारीने काम करणार ?, जनतेच्या समस्यांवर ठोस निर्णय घेतले जातात की नाही, यावरच उरणकरांची पुढील दिशा ठरणार आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# २१ फेब्रुवारी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस

## विषय:- मातृभाषा ही जगातील प्रत्येक व्यक्तीची 'आन बाण शान'असुन ईश्वरी देण आहे.

जगात कुठेही जा परंतु मातृभाषेला विसरू नका. आज प्रत्येक देशात मातृभाषेला आगळेवेगळे महत्व आहे. त्याचप्रमाणे भारतात सुध्दा प्रत्येक राज्यात मातृभाषेला आगळे वेगळे स्थान आहे. मातृभाषा शिकविली जात नसून जन्मताच अवगत असते याला ईश्वरी देणच म्हणावे लागेल.त्यामुळे जगातील कोणताही व्यक्ती असो त्याला आपल्या मातृभाषेचा गर्व आणि अभिमान असने सहाजीकच आहे आणि असायला सुध्दा पाहिजे.जगामध्ये प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचे महत्व कळावे या उद्देशाने नोव्हेंबर १९९९ मध्ये यूनेस्को येथे आंतरराष्ट्रीय मातृभाषा दीवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.कारण २१ फेब्रुवारी १९५२ मध्ये ढाका युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तत्कालीन पाकिस्तान सरकारच्या भाषा नितीचा विरोध केला होता.कारण त्यांना आपल्या मातृभाषेचे अस्तीत्व टीकवुन ठेवायचे होते.प्रदर्शनकारी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी होती की बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा मिळावा. परंतु अशा परीस्थितीत पाकिस्तान पुलिसने प्रदर्शनकारी विद्यार्थ्यांवर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला.परंतु विरोध थांबला नाही.अंततः पाकिस्तान सरकारला बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा द्यावा लागला. मातृभाषेच्या आंदोलनादरम्यान शहीद झालेल्या युवकांना श्रध्दांजली देण्यासाठी यूनेस्कोने नोव्हेंबर १९९९ ला जनरल कांफ्रेंसमध्ये आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला व २१ फेब्रुवारी ही तारीख ठरवीण्यात आली. तेव्हापासुन संपूर्ण जगात २१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा केल्या जावु लागला.संयुक्त राष्ट्रानुसार जगात बोलल्या जानाऱ्या एकुण भाषा साधारणतः ६९०० आहेत.यात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या १० भाषेमध्ये इंग्रजी,मंदारीन, हिंदी,जापानी,रूसी,बांग्ला,पुर्तगाली, अरबी,पंजाबी आणि स्पेनिश इत्यादी आहेत.भारताचा विचार केला तर मातृभाषेला आगळेवेगळे महत्व दीसुन येते.भारतात प्रत्येक ४० कीलोमिटर नंतर आपल्याला भाषा बदलतांना दीसते.ज्या प्रमाणे म्हटल्या जाते, "कोस-कोस पर पाणी बदले,चार कोस पर वाणी" याप्रमाणे भारतात मातृभाषा बदलतांना दीसते. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी जरी असली तरी प्रत्येक ४० कीलोमीटर नंतर लोकांच्या रहानीमानासह भाषांमध्ये व संस्कृतीमध्ये आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचा गोडवा पहायला मिळतो.भाषेचा विचार केला तर भारताची भाषा व संस्कृती ही जगावेगळी असल्याचे दिसून येते.भारतात अनेक जातींचे, पंथाचे,धर्माचे लोक राहतात.भारतात २८ राज्य व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत.त्यामुळे भारतातील प्रत्येक राज्याची मातृभाषा वेगळी आहे.त्यातही प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक ४० कीलोमिटरच्या अंतरावर भाषेचा वेगळा गोडवा दीसुन येतो.भारतात "हिंदी दिलं की धडकन तो मातृभाषा दिलं की आवाज" यापध्दतीने मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा सन्मान केल्या जातो.वल्ड लॅंग्वेज डेटाबेसनुसार २२ व्या संस्करण इथोनोलॉजच्या नुसार जगातील २० सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये हिंदी ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची भाषा मानल्या जाते. ज्याप्रमाणे मातृत्व आणि पितृत्व महत्वाचे आहे.त्याचप्रमाणे प्रत्येक देशाची मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषा महत्त्वाची असल्याचे मी समजतो.जगात अनेक भाषांचे भंडार आहेत यात दुमत नाही.त्या संपूर्ण भाषा अवगत केल्याही पाहिजे यामुळे ज्ञानाचा भंडार वाढतो.परंतु त्या भाषेच्या आड मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.आजही भारतात इंग्रजी भाषेला जास्त महत्व दील्या जाते हे दुर्भाग्य म्हणावे लागेल. भारतातील नामांकित व्यक्ती किंवा हायप्रोफाइलमध्ये रहाणारे किंवा वॉलिवुडमधील व्यक्तीसुध्दा इंग्रजी भाषेला महत्व देवून मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेला विसरतांना दिसतात.याला सरकारने कोठेतरी थांबवीले पाहिजे.यामुळे मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा अपमान होतो.जगातील कोणताही देश असो प्रत्येकाची मातृभाषा म्हणजे पुर्वजांचा एक ठेवाच आहे.त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणतेही कार्य करतांना किंवा बोलतांना मातृभाषेला प्रथम स्थान द्यायला पाहिजे. प्रत्येकांची मातृभाषा ही त्या-त्या संस्कृती नुसार अवगत असते.त्यामुळे आपण जर बाहेर निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर नंतर आपल्याला प्रत्येक भाषेत थोडा-थोडा बदल झालेला दिसतो. सांगायचे तात्पर्य की देशात किंवा जगात कुठेही जावे परंतु मातृभाषेचा विसर पडणार नाही याची काळजी सर्वांनीच जातीने घेतली पाहिजे. जगातील संपूर्ण भाषेचा व संस्कृतीचा अभ्यास करायलाच पाहिजे.परंतु आपल्या संस्कृतीला किंवा मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याचीही सुध्दा काळजी घेतली पाहिजे.सध्याच्या परीस्थितीत आपण पहातो आई-बाब, काका-काकु, मामा-मामी,आजी-आजोबा,माऊशी-मावसा इत्यादी अनेक जुन्या शब्दांना विसरून मम्मी,डॅडी,पप्पा,मॉम,अन्टी इत्यादी अनेक इंग्रजी शब्दांचा वापर होतांना आपण पहातो. त्याचप्रमाणे मामी-मामा, काका -काकु,माऊशी-माऊसाजी या शब्दाला आगळे वेगळे महत्त्व आहे.कारण यातुनच नात्याची वेगवेगळ्या पध्दतीने ओळख दिसून येते.परंतु आता या नावाचे महत्व विसरून या सर्वांना अन्टी व अंकल मध्ये परीवर्तीत केल्याचे दिसून येते.हे मातृभाषेच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.त्याचप्रमाणे मुलांना बालपणापासून मोबाईलची सवय लावल्याने सुध्दा मातृभाषेचा विसर होतांना दिसतो.याचा परीणाम मातृभाषेवर होवु शकतो याला नाकारता येत नाही. भारतात १९५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत हासुद्धा भारताचा इतिहासच आहे.प्रत्येकाने जर आपल्या मातृभाषेचा सटीक वापर केला तर भारतातील प्रत्येक व्यक्तीला अनेक भाषा आपोआपच अवगत होतील व सर्वांजवळ मोठ्या प्रमाणात भाषेचा भंडार आपोआप निर्माण होईल.यामुळे प्रत्येकाचे भाषेचे ज्ञान मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत होईल. भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की लोकसभेत किंवा राज्यसभेत काही सांसद मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषा (हिंदीचा) वापर न करता इंग्रजी भाषेचा वापर करतात यावर आंतरराष्ट्रीय मातृभाषेच्या निमित्ताने अंकुश लावण्याची गरज आहे.कारण अनेक देशांत आताही त्यांच्याच देशातील भाषा बोलल्या जाते उदाहरण द्यायचे झाले तर जापान, चीन, स्पेन,अरबी, रशिया, जर्मनी, इस्त्रायल इत्यादी अनेक. त्यामुळे भारतातील प्रत्येक भाषेला महत्व देण्याची आवश्यकता आहे. मी देशातील जनतेला हेच सांगु इच्छितो की इंग्रजी भाषेऐवजी मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषेचा उपयोग जास्तीत जास्त केला तर येणारी पीढी याचे स्वागतच करेल.त्यामुळे देशासह जगातील प्रत्येक व्यक्तीने मातृभाषेचा आदर व मानसन्मान करावा. मातृभाषा ही प्रत्येक व्यक्तीची आन बाण शान व ईश्वरी देण असुन समुद्रापेक्षाही अफाट व शक्तीशाली आहे कारण सर्वांच्याच ज्ञानाचे उगमस्थानच मातृभाषेतूनच झाले आहे.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर).

# वंधत्वाचा सामना करणाऱ्या जोडप्यांचे पालकत्वाचे स्वप्न होणार साकार

## खारघरमध्ये मदरहूड फर्टिलिटी अँड आयव्हीएफ ने नेक्स्ट-जनरेशन फर्टिलिटी ट्रीटमेंट सेंटरचा केला शुभारंभ

दैनिक युवक आधार

खारघर, नवी मुंबई : हल्लीच्या काळात जोडप्यांमधील सगळ्यात मोठी समस्या म्हणजे वंध्यत्व. प्रदूषण, शहरीकरण, मानसिक ताण, रासायनिक घटकांचे हवेतील वाढते प्रमाण, खाण्या-पिण्याच्या सवयी इ. गोष्टींमुळे हार्मोन्समध्ये (Hormones) बदल होतात आणि त्यामुळे वंध्यत्वाची समस्या उद्‌भवू शकते. अशा जोडप्यांच्या पालकत्वाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदरहूड हॉस्पिटल्सने खारघरमध्ये त्यांचे अत्याधुनिक मदरहूड फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर सुरु केले. हे केंद्र प्रजनन उपचारांच्या शोधात असणाऱ्या जोडप्यांना क्लिनिकल तज्ज्ञ, भ्रूणशास्त्रातील आधुनिक तंत्रज्ञान, अत्याधुनिक आयव्हीएफ लॅब आणि सकारात्मक गर्भधारणा साध्य करण्यासाठी जोडप्यांच्या प्रवासाला पाठिंबा देण्यासाठी एक अनुभव टीम उपलब्ध करुन देत आहे.




या शुभारंभ प्रसंगी बोलताना, मदरहूड हॉस्पिटल्सचे सीईओ श्री. विजयरत्न वेंकटरमन सांगतात की,अनेक जोडप्यांसाठी वंध्यत्व ही एक गंभीर समस्या ठरत आहे आणि अशा जोडप्यांना उच्च दर्जाच्या प्रजनन उपचारांची आवश्यकता भासत आहे. मदरहूड फर्टिलिटी आणि आयव्हीएफमध्ये, आम्ही जागतिक दर्जाचे प्रजनन उपचार मिळवून देणार आहोत. अनुभवी तज्ञांच्या टीम, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णांना प्राधान्य देणारा दृष्टिकोन यासह नवी मुंबई आणि जवळपसाच्या जोडप्यांना यशस्वी प्रजनन उपचार देण्याचे आमचे मुख्य उद्दिष्ट्य आहे.डॉ. रीटा मोदी(वरिष्ठ आयव्हीएफ सल्लागार, मदरहुड फर्टिलिटी अँड आयव्हीएफ, खारघर) यांनी क्लिनिकल प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले आणि म्हटले की, जागतिक आरोग्य संघटनेनुसार, प्रजनन वयोगटातील सर्व जोडप्यांपैकी सुमारे 6 पैकी 1 जोडप्यांना नैसर्गिकरित्या गर्भधारणा करण्यात अडचणी येतात, ज्यामुळे गरजूंसाठी परवडणाऱ्या, उच्च दर्जाच्या प्रजनन उपचारांची उपलब्धता वाढवण्याची गरज आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे, आता जोडप्यांना त्यांचे स्वप्न साकार करण्यात मदत करणे शक्य झाले आहे.

नवी मुंबईतील खारघर येथील मदरहुड फर्टिलिटी अँड आयव्हीएफच्या शुभारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित नवी मुंबईच्या डीसीपी रश्मी नांदेडकर सांगतात की, कुटुंब सुरू करणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते, परंतु वंधत्वासारख्या काही आव्हानांमुळे या प्रवासात अनेक अडथळे येतात.या समस्यांना तोंड देणाऱ्या जोडप्यांना योग्य वैद्यकीय सेवा आणि प्रगत उपचारांची उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. खारघरमध्ये या आयव्हीएफ केंद्राची सुरुवात हे वंधत्व निवारणाच्या दिशेने एक उत्तम पाऊल ठरत आहे. उपचारांव्यतिरिक्त, जागरूकता पसरवणे आणि प्रजनन समस्यांबद्दलचा कलंक दूर करणे महत्त्वाचे आहे.जोडप्यांना पालकत्वाचे स्वप्न साकार करण्यासाठी मदत करत मदरहुड हॉस्पिटल्सच्या या सकारात्मक उपक्रमाचे मला कौतुक वाटते.

खारघर येथील मदरहुड हॉस्पिटल्सच्या फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. रूपाली सुनील कदम सांगतात की, खारघरचा वेगाने विस्तार होत असून हे आरोग्यसेवेचे केंद्र बनत आहे. प्रजनन उपचारांची दिवसेंदिवस मागणी वाढत असून या नवीन केंद्राच्या माध्यमातूम आम्ही नवी मुंबईतील तसेच आजूबाजूच्या परिसरातील जोडप्यांना उपचारांकरिता इतरत्र धाव घ्यावी लागू नये याकरिता खास सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. परवडणाऱ्या दरात उच्च दर्जाचे प्रजनन उपचार पुरविणे हे आमचे ध्येय्य आहे.मदरहूड हॉस्पिटल्स, महिला आणि बाल आरोग्यसेवेतील त्यांच्या व्यापक कौशल्यासह, आता प्रजनन उपचार पुरवून वंधत्वाने झुंजणाऱ्या जोडप्यांकरिता आशेचा किरण ठरणार आहे. बंगळुरू, इंदूर, गुडगाव, नोएडा, कोइम्बतूर, चंदीगड आणि आता खारघरसह अनेक शहरांमध्ये १२ प्रजनन केंद्रांसह प्रभावी उपचार पुरविले जात आहेत.

===========

# सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मुंबई गोवा महामार्गाचा पाहणी दौरा केला

दैनिक युवक आधार

**पनवेल प्रतिनिधी :** मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक अडथळे दूर करत काही महिन्यातच पूर्णत्वास येणार आहे. गुरुवारी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मुंबई गोवा महामार्गाचा पाहणी दौरा केला. पनवेल तालुक्यातील पळस्पे फाटा येथून महामार्गाच्या पाहणी दौऱ्याला सुरुवात झाली दरम्यान राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले हे पहिल्यांदाच पनवेल तालुक्यात आले होते. मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, दीपक बेहेरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, प्रीतम म्हात्रे रुपेश नागवेकर,अमरीष मोकल, केळवणे विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, साई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्याधर मोकल, किसान मोर्चाचे अतुल बडगुजर यांच्यासह अधिकारी वर्ग उपस्थित होते .पनवेल ते हातखंबा रत्नागिरी असा हा पाहणी दौरा होता. यासंदर्भात राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.



# दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभाग आयोजित शिवजनोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड** : शिवरायांच स्वराज्य संघर्ष त्यांनी केवळ तलवारीच्या जोरावर नव्हे, तर चातुर्य, धोरण आणि जनतेच्या विश्वासाच्या जोरावर स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्य हे केवळ एक राज्य नव्हते, तर ते एका नव्या युगाची सुरुवात होती-जेथे न्याय, समानता आणि लोककल्याणाला सर्वोच्च स्थान होते.याच आपल्या राजा बद्दल आत्ताच्या एकविसाव्या शतकातील पिढीला ही जाणीव व्हावी याकरिता दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागातर्फे सलग ६ वर्ष शिवजन्मोत्सव डोंगरमाथ्यावर असणाऱ्या द्रोनागिरी किल्ल्यावर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्या ठिकाणी विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते १२ - द्रोणागिरी गडाची सफाई आणि सजावट,सायं. ४ वा. - गडावरील कुंडातील पाणी घेऊन खाली उतरने. सायं ७ वाजता राथमिरवणूक, ८ ते ९.३० मशाल फेरी आणि दिपोत्सव रात्री १० वा. विमला तलाव येथील महाराजांच्या मूर्तीचे अभ्यंग स्नान.सायं. तर दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७.०० वा. - बाळ शिवाजी राजांचा पाळणा हलवणे,सकाळी ८.०० वा. - शिवप्रतिमा पूजन,सकाळी ९.०० वा. पालखी मिरवणूक, द्रोणागिरी गडावर गणेश पूजन, ध्वजपूजन, शिवराज्याभिषेक, दुर्ग पूजन, चिमुकल्यांचे पोवाडे, शिव्याख्यान, तसेच शाहिरी पोवाडा, आणि मान्यवरांचे स्वागत तसेच गडावर सर्व आलेल्या शिवप्रेमींकरिता शिवभोजन. सायंकाळी ४.०० वा. गडावरून खाली उतरणे, सायं. ५.०० वा. निरोप समारंभ असे विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. सदर सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभाग, सहकारी शिवप्रेमी, शिवभक्त डाऊरनगर ग्रामस्थ या सर्वांनी विशेष मेहनत घेतली.सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागच्या वतीने द्रोणागिरी गडावर पारंपारिक पद्धतीने शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. यंदाचे हे उत्सवाचे ६ वे वर्षे होते. यावर्षी भाविक भक्त, शिव भक्त या शिवजन्मोत्सवात मोठया संख्येने सहभागी झाले होते. शिवजन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वच कार्यक्रमांना जनतेचा, नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. अशी माहिती दुर्ग मावळा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश कावले, उरण विभाग अध्यक्ष राज मात्रे उपाध्यक्ष मनीष पाटील, आणि मंडळाचे सर्व शिलेदार यांनी दिली. त्याचबरोबर चाणजे ग्रामपंचायत सरपंच मा. अजयजी म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते मा. संतोष पवार साहेब, खोपटे गावातील उद्योगपती अजित पाटील, कैलास म्हात्रे यांनीही शिवजन्मोत्सव कार्याला विशेष उपस्थित दर्शविली आणि प्रतिष्ठानच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. कार्यक्रमाच्या समारोपात सहकारी बंधू, भगिनींचे दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभाग तर्फे आभार मानण्यात आले. आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. आणि ज्या उत्साहाने सकाळी गड चढले त्याच उत्साहाने संध्याकाळी शिवगर्जना देत सर्व मावळे गड उतार झाले.







# शिव जयंती उत्साहात साजरी

दैनिक युवक आमले

**नवीन पनवेल** : जिल्हा परिषद शाळा, फणसवाडी आणि महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती अगदी उत्साहात फणसवाडी येथे साजरी झाली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अरविंद मोरे, विशेष कार्यकारी अधिकारी व गुणवंत कामगार, शाळेच्या शिक्षिका नेहा गावंड, सविता सरगर, शाळा व्यवस्थापन सदस्य पालक समिती बाळू भगत, महाराष्ट कामगार कल्याण मंडळ, पनवेल केंद्र प्रमुख विद्यानंद कदम व सतीश पारधे उपस्थित होते.

याप्रसंगी शाळेच्या शिक्षिका नेहा गावंड आणि सविता सरगर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणीच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद मोरे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे मानवतावादी व कल्याणकारी राजे होते. त्यांनी सामान्य जनतेसाठी बऱ्याच कल्याणकारी योजना राबविल्या. त्यातील एक योजना ही जलनीती योजना ही कल्याणकारी होती. ह्या जलव्यवस्थापनामुळे आजही सर्वच किल्यांवर मुबलक पाणी आढळते. तेव्हा महाराजांनी जलव्यवस्थापन योग्य केल्यामुळे शेतीला मुबलक पाणी मिळत असे व खऱ्या अर्थाने शेती उद्योगाला चालना मिळत असे. ह्या शिवाजी महाराजांच्या जलनीती योजनेचे आपण पालन केले तर आपण सुद्धा टँकर मुक्त होऊ. आपण सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श गुण आत्मसात केले तर खऱ्या अर्थाने शिव जयंती साजरी केली असे म्हणता येईल. याप्रसंगी शिवाजी कोण होता? हे पुस्तक मुलांना मा. अरविंद मोरे यांच्यातर्फे भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन विद्यानंद कदम यांनी केले. याप्रसंगी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे मुलांना खाऊचे सुद्धा वाटप करण्यात आले.




# सालाबाद प्रमाणे याही वर्षी उतेखोल वाडी शिवजयंती साजरी करण्यात आली विविध कार्यक्रम शिवजयंती

## (दैनिक युवक आधार संदेश बांदल प्रतिनिधी माणगाव रायगड )







# राज्यस्तरीय शालेय शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धेत होरायझन अकॅडमी निफाड शाळेच्या विद्याथ्यानी मारली बाजी

दैनिक युवक आधार

**निफाड प्रतिनिधी /राहुल कुलकर्णी** : निफाड महा शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशन वृत्तमती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यामाने राज्यस्तरीय शालेय शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धा 2024-25 घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये होरयझन अकॅडमी निफाड शाळेचे विद्यार्थी मितांशु जाधव याने 47 किलो वजनगटात सुवर्ण पदक पटकावले तसेच भाग्यश्री रोटे 54 किलो वजनगटात सुवर्ण पदक पटकावले तसेच स्वयम वर्मा 560 किलो वजन गटात सिल्वर पदक पटकावले तसेच ओवी रोटे 36 किलो वजनगटात सिल्वर रौप्य पदक पटकावले निरुपिता केदार, ऋत्विक निकम, नील हळदे , अरफाद शेख ,देवेन कानमहाले ,संस्कार तळेकर, दिक्षिता चौथाणी, पदक मिळवुण अरफाद शेख, यांनीही कास्य पदक मिळवून चांगली कामगिरी केली पदक पटकावून चे नाव शाळेचे व नाशिक जिल्हाचे नाव वाढवले, शाळेच्या विद्यर्थ्याना क्रिडा शिक्षक कुणाल जाधव सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.. विद्यार्थ्याने केलेल्या कामगिरीचे कौतुक आणि त्यांचे अभिनंदन मराठा प्रसारक समाज सभापती बाळासाहेब क्षीरसागर सर यांनी व शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांनी मनभरून कौतुक केले व पुढिल वाढ वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





# भारज बुद्रुक येथे श्री संत गजानन महाराज प्रगट दिन पालखी दिंडी सोहळा संपन्न

दैनिक युवक आधार

**प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुं निकाळजे/वरूड सर्कल,** जाफ्राबाद -जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बुद्रुक येथे श्री संत शिरोमणी गजानन महाराज यांच्या १४७ व्या प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला
संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे

त्यामुळेच त्यांना ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते कारण त्यांची महिमा संपूर्ण ब्रम्हांडात प्रचलित आहे असे यावेळी श्री संत गजानन महाराज यांची भव्य दिव्य स्वरूपात पालखीचे आयोजन करण्यात आले असून

महिलांनी आपापल्या दारी सडा सारवन रांगोळी श्री च्या पालखीची सुरुवात श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर पासून होते.श्री संत गजानन महाराज प्रगट दिन पालखी दिंडी सोहळ्यात माता, भगिनी , बाळ गोपाळ वारकरी ,भजनी , मंडळे आशा अनेक प्रकारचे मंडळे सहभागी होतात
श्री च्या प्रगट दिनाच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.यावेळी भारज बुद्धक गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिसून येतो .




==========================

# चिपळे येथे शिवजयंती साजरी



दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर** : बालाजी निवास सोसायटी, चिपळे आयोजित शिवजयंती 19 फेब्रुवारी या दिवशी बालाजी निवास सोसायटीच्या वतीने शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक साळुंखे व इथापे पोलीस हवालदार हे उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात करण्यात आले. त्यानंतर सोसायटीतील सर्व विद्यार्थ्यांची हस्ताक्षर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली व संध्याकाळी ८ वा. सोसायटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित भाषणे करण्यात आली. कार्यक्रमासाठी उपस्थित विलास फडके (रायगड जिल्हा परिषद सदस्य )तसेच बी.के. पाटील (माजी सरपंच ग्रुप ग्रामपंचायत चिपळे) हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमा अंतर्गत शिवाजी शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने हस्ताक्षर, चित्रकला, भाषण स्पर्धा, संगीत खुर्ची इत्यादी इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या आणि विलास फडके यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी सोसायटीचे खजिनदार आनंदा माने, सचिव सागर जगे दीपक जगे, गोपाळ परत बादी, यादव काका,चेतन परत बादी, अभय माने व सोसायटीतील सर्व महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे यांनी केले व कार्यक्रमाचा समारोप महाराष्ट्र राज्य गीताने करण्यात आला.

# भारतात स्ट्रक्चरल हृदयरोगा विषयी जागरूकता वाढवणे गरजेचे

## अपोलोने हृदय आजारावरील उपचारांमध्ये नवीन तंत्रांचा उपयोग करण्यात यश संपादन केले

दैनिक युवक आधार

**नवी मुंबई, प्रतिनिधी /२१ फेब्रुवारी २०२५**: अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने दरवर्षी २२ फेब्रुवारी रोजी साजऱ्या केल्या जाणाऱ्या, हृदयाच्या झडपेच्या आजाराविषयी जागरूकता दिवसाच्या निमित्ताने, आपल्या स्ट्रक्चरल हार्ट स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या अध्यक्षतेखाली एका अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हृदयाच्या झडपेच्या आजाराच्या वाढत्या केसेस आणि त्यावर उपलब्ध असलेल्या विविध उपचार पर्यायांविषयी माहिती देऊन जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने हॉस्पिटलने हा पाऊल उचलले. स्ट्रक्चरल हृदय रोग एक असा आजार आहे, जो हृदयाच्या झडपा आणि त्यांच्या चेंबर्सना प्रभावित करतो. दरवर्षी याच्या केसेस वाढत आहेत. हा आजार एकतर जन्मजात असू शकतो किंवा काही विशिष्ट कारणांनी नंतरच्या काळात देखील उद्भवू शकतो.ऍट्रियल सेप्टल दोष (ASD) आणि वेंट्रीक्युलर सेप्टल दोष (VSD) ही जन्मजात हृदय रोगाची (CHD) उदाहरणे आहेत. त्यांच्यावरील उपचार पीडियाट्रिक इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट करतात. नंतरच्या आयुष्यात हा आजार ज्या कारणांमुळे उद्भवू शकतो अशांमध्ये ऱ्हुमॅटिक हार्ट डीसिज (आरएचडी), वय वाढणे, कॅल्शियम जमा होणे, आनुवंशिकता इत्यादींचा समावेश असतो. स्ट्रक्चरल हृदय रोगाची अनेक लक्षणे असू शकतात, जसे की, श्वास घेण्यात त्रास होणे, छातीमध्ये वेदना, चक्कर येणे, घाबरणे, पायाचा घोटा, पाय किंवा पोटामध्ये सूज इत्यादींचा त्यामध्ये समावेश असतो. अनेक लोक सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात, त्यामुळे जागरूकता खूप महत्त्वाची आहे. आजार वेळीच लक्षात आल्यास गुंतागुंत टाळता येऊ शकते.

हृदयाच्या झडपेच्या आजाराविषयी जागरूकता दिवसाच्या निमित्ताने, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने आपल्या कार्डियाक तज्ज्ञांसह, जीव वाचवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. हे सर्व कार्डियाक तज्ञ कार्डियाक व्हॉल्व आणि रिदम मॅनेजमेंट डिव्हायसेस, पेसमेकर आणि वेंट्रीक्युलर सहायक उपकरणे यासारख्या प्रगत स्ट्रक्चरल हृदय उपकरणांचा उपयोग करण्यात प्रशिक्षित आहेत. सर्व कार्डियाक तज्ञांनी भर दिला की, हृदयाच्या आजारांचे लवकरात लवकर निदान केले जावे यासाठी नियमितपणे आरोग्य तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे.डॉ राहुल गुप्ता-सिनियर कन्सल्टन्ट इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी, स्ट्रक्चरल हार्ट डीसिज अँड रिदम डिसऑर्डर स्पेशालिस्ट, व्हॉल्व एक्स्पर्ट - टीएव्हीआय, टीएमव्हीआर, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी सांगितले,"प्रगत मिनिमली इन्वेसिव (ज्यामध्ये शरीरावर कमीत कमी चिरा दिल्या जातात, रक्तस्त्राव कमीत कमी होतो) उपचार करून रुग्णांना निरोगी जीवन जगण्याची आणखी एक संधी देण्यात आम्ही सक्षम आहोत. आमच्या एक रुग्ण ७३ वर्षांच्या महिला खूप कमजोर झाल्या, त्यांच्या तब्येतीमध्ये खूप जास्त गुंतागुंत होती, त्यामुळे त्यांच्यावर ओपन हार्ट प्रक्रिया करणे खूप धोकादायक होते. त्यांना ऱ्हुमॅटिक हार्ट डीसिज (RHD) आधी झालेला होता, ज्यासाठी २०१७ साली त्यांचे मिट्रल व्हॉल्व रिप्लेसमेंट केले गेले होते. ECG मध्ये समजले की, त्यांना गंभीर ट्रायक्यूस्पिड व्हॉल्व आजार आहे. पारंपरिक प्रक्रिया त्यांच्यासाठी व्यवहार्य पर्याय ठरल्या नसत्या, आम्ही TRIC व्हॉल्व प्रक्रिया केली, ज्याचे खूप चांगले परिणाम दिसून आले. त्या रुग्ण महिलेला दुसऱ्या दिवशीच घरी पाठवण्यात आले, त्यांच्या कामे करण्याच्या क्षमतेमध्ये उल्लेखनीय सुधारणा झाली आहे."

डॉ महेश घोगरे - सिनियर कन्सल्टन्ट इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी, स्ट्रक्चरल हार्ट डीसिज, टीएव्हीआय स्पेशालिस्ट, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी सांगितले, "९१ वर्षांचे पुरुष रुग्ण सुरुवातीला डेंटल प्रोसिजरसाठी आले होते, तेव्हा त्यांनी सांगितले की, त्यांना दोनदा चक्कर आली होती. तपासणीमध्ये समजले की, त्यांना गंभीर एओर्टिक स्टेनोसिस होते. सर्जरी करण्यात खूप जास्त धोका होता, त्यांना ट्रान्सकॅथेटर एओर्टिक व्हॉल्व इम्प्लान्ट यशस्वीपणे केले गेले. पारंपरिक व्हॉल्व रिप्लेसमेंट सर्जरीला हा एक मिनिमली इन्वेसिव्ह पर्याय आहे. आज ते आपली सर्व नियमित कामे आरामात करू शकत आहेत आणि या प्रक्रियेने त्यांना एक नवे जीवन बहाल केले आहे."




# सरकुंडी येथे बुद्ध विहार आंबेडकर नगर मध्ये युवा सेना महाराष्ट्र युवकाकडून शिवजयंती साजरी



दैनिक युवक आधार

**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ/खेड पुणे** : सुरकुंडी येथे दरवर्षी प्रत्येक महामानवांची जयंती साजरी होत असते यावर्षी देखील शिवाजी महाराजांच्या जयंती सादर करण्यात आली प्रत्येक ग्रामस्थांचं सहभाग दिसून येत नाही परंत परंतु गावच्या निवडणुकीमध्ये ग्रामस्थांचा सहभाग खूप मोठ्या प्रमाणात असतो असे युवकांनी आपले मत स्पष्ट मांडले आहे या कार्यक्रमासाठी सर्वप्रथम युवकांनी तथागत भगवान गौतम बुद्ध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले ज्या महापुरुषांनी समाजासाठी व लोकांच्या हितासाठी आपला आयुष्य पणाला लावलं त्या महापुरुषांचे विचार प्रत्येकाने आत्मसात केले पाहिजे असे युवकांनी भाषणात प्रकट केले याप्रसंगी महाराष्ट्र युवा सेना तालुका अध्यक्ष साहिल कडलग खेड तालुका उपाध्यक्ष डॉक्टर वेदांत ओव्हाळ कार्याध्यक्ष माऊल धोत्रे सरकुंडी गावचे युवा प्रगतशील शेतकरी फायनल सम्राट योगेश शेठ केदारी स्वप्निल ओव्हाळ रंगनाथ ओव्हाळ आदित्य ओव्हाळ कोंडीबा ओव्हाळ मा. मुख्याध्यापक रामचंद्र ओव्हाळ गुरुजी सदर कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन डॉक्टर वेदांत ओव्हाळ यांनी केले व सर्वांचे आभार व्यक्त केले

# पवार विद्यामंदिरमध्ये विविध कार्यक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी



दैनिक युवक आधार

**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

**पुणे**: पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ शिक्षण प्रसारक मंडळाच्या सौ. प्रतिभा पवार विद्यामंदिरमध्ये विविध कार्यक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यानिमित्ताने निबंध, चित्रकला आणि कथाकथन स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच मीनाक्षी मेमाणे आणि उमाकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली गेले सहा दिवस शाळेतील साठ विद्यार्थ्यांनी शिवचरित्राचे वाचन केले.मुख्याध्यापक शाम धुमाळ व उद्धव डेरे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. नारायण शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या मार्गावर चालण्यासाठीची शिवशपथ दिली. शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज, जिजाबाई, सईबाई, संभाजीराजे आदींच्या वेशभूषा केल्या. केळेवाडी, हनुमाननगर, राऊतवाडी आणि मोरे विद्यालय चौक या ठिकाणाहून शिवरायांचा जयजयकार करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी ढोल वादन, लेझीम नृत्य लाठीकाठी आणि मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांनी शिवमहिमा सांगणाऱ्या गीतांवर नृत्य सादर केले. श्रावणी सांबरे या विद्यार्थिनीने हिरकणीच्या पराक्रमाचा पोवाडा गायला. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिवरायांची माहिती सांगितली. शिवरायांबद्दल उत्कृष्ट माहिती सांगितल्याबद्दल ध्रुव नेरळेकर याचा सत्कार शहाजी जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन सुनिता ढुमे, मनिषा नवले आणि अमोल समगीर यांनी केले. नंदा कोकरे, शर्मिला खारतोडे यांनी सूत्रसंचालन केले. कोमल राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्तात्रय जाधव, किशोर शिंदे, वनिता रांगडे, भाग्यश्री भोसले यांनी सहकार्य केले.

# सणसर येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा संपन्न




दैनिक युवक आधार

**सणसर विकास क्षत्रिय** : श्री छत्रपती हायस्कूल सणसर च्या 2004-05 बॅचला 20 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल सणसर येथील युवकांनी दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मेळाव्याचे आयोजन करून शनिवार दिनांक 08 फेब्रुवारी रोजी आनंदमय उत्साहात संपन्न झाला.यावेळीचे मुख्याध्यापक मोरे सर,झालटे सर,जगताप सर,उपस्थित होते.झालटे सर व शामराव यादव सरांनी विध्यार्थीनां मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी माजी विध्यार्थी मयूर कुलकर्णी व वर्षा गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

सन 1993 साली भवानीनगर येथील श्री. छत्रपती शिक्षण संस्था यांच्यामार्फत सणसर येथे श्री छत्रपती हायस्कूल ची शाखा चालु करण्यात आली आहे,तेव्हा पासुन आतापर्यंत सणसर येथील हायस्कूल मध्ये हा पहिलाच स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यापुढे ही या बॅचचे विद्यार्थी दर वर्षी स्नेह मेळावा घेणार आहेत अशी माहिती वसिम सय्यद यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांतर्फे दिली आहे.हा मेळाव्याचे आयोजन करण्यासाठी चार महिने अमोल चव्हाण यांनी अथक परिश्रम घेऊन अमोल चव्हाण यांनी या बॅचचा व्हाट्सअप ग्रुप बनवून सर्व माजी विध्यार्थी यांच्याशी संपर्क आणि चर्चा करून स्नेह मेळावा करण्याचे ठरविले त्यांच्या सोबत स्वप्निल शिंदे,वसिम सय्यद,बंडु खटके,पल्लवी कुंभार,दिपाली दळवी,सोनाली चव्हाण यांनी सर्वांना एकत्र जोडण्याचे काम केले आणि संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन ही केले तसेच गणेश गवळी,निलेश वाघ,वैशाली निंबाळकर यांनी सहकार्याची भुमिका बजावली.कार्यक्रमासाठी माजी विध्यार्थीनीं देणगी देऊन आजी माजी शिक्षकांचा व विध्यार्थी यांचा यतोचीत सत्कार करून भोजनाचा आस्वाद घेण्यात आला.यावेळी सणसर हायस्कूल चे मुख्याध्यापक सुनील सर्जे व शिक्षक दिपक भोसले,परशुराम घाडगे,संजय थोरात,आदी सर्वजण उपस्थित होते.हा उपक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी कलाशिक्षक परशुराम घाडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान बोकडवीरा-उरणच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा मोठया जल्लोषात साजरा

दैनिक युवक आधार

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील** : नवीन मुंबईचे शेवट टोक आणि आद्यगणेशाच्या आशीर्वादाने पुनीत झालेल्या बोकडवीरा गावात प्रतिवर्षा प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान बोकडवीरा-उरणच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा मोठया जल्लोषात साजरा करण्यात आला.सपूर्ण गवला आज जणू किल्ले रायगडचे स्वरूप प्राप्त झाले होते,सारा परिसर भगव्या झेंड्यानी आणि पताकांनी बहरला होता.बोकडवीरा गावांतील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात उभारलेल्या भव्य-दिव्य शामियानात आद्य गणेशाला वंदन करून मंत्रांच्या जयघोषात बोकडवीरा गावाच्या माजी सरपंच सौ.मानसी पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यावेळी. फटाक्यांच्या धूमधडाक्यात जयभवानी जयशिवाजीच्या घोषणांनी असमंत दणाणून गेला उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांव पंचक्रोशिंतील शिवप्रेमिनी महाराज्यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. या नंतर बोकडवीरा गावाचा प्रसिद्ध मैदानी खेळ कब्बडी सामन्यांचे उद्घाटन



प्रसिद्ध विधीज्ञ ॲड.विजय पाटील.कामगारनेते कॉ.भूषण पाटील,उरणउत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील,सिडको एम्प्लॉइजयुनियनचे मा.अध्यक्ष विनोद पाटील,बोकडवीरा गावाच्या माजी सरपंच सौ. मानसी पाटीलआणि सौ.हेमलता पाटील यांच्या हस्ते व बोकडवीरा गावाचे आजी माजी ग्रा.प.सदस्य आणि ग्रामस्थव कब्बडीपेमी यांच्या उपस्थितीत पारपडला., सायंकाळी ढोल ताशाच्या गजरात छत्रपतीशिवाजी महाराज्यांची पालखी मिरवणूक धूमधडाक्यात काढण्यात अली रात्रो कब्बडी स्पर्धेतील विजेत्या संघाना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरणकरण्यात आले. यावेळी प्रो.कब्बडी स्टार कु.मयूर कदम याचा विशेष सत्कार करण्यात आला.हा सोहळा यशस्वी करण्या साठीमाजी ग्रा.प. सदस्य शेखर पाटील,खंडेश्वर पाटील समवेत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे असंख्य मावळे,बोकडवीरा ग्रामस्थयांचे विशेष सहकार्य लाभले.

सायंकाळी ढोल ताशाच्या गजरात छत्रपतीशिवाजी महाराज्यांची पालखी मिरवणूक धूमधडाक्यात काढण्यात अली रात्रो कब्बडी स्पर्धेतील विजेत्या संघाना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरणकरण्यात आले. यावेळी प्रो.कब्बडी स्टार कु.मयूर कदम याचा विशेष सत्कार करण्यात आला.हा सोहळा यशस्वी करण्या साठीमाजी ग्रा.प. सदस्य शेखर पाटील,खंडेश्वर पाटील समवेत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे असंख्य मावळे,बोकडवीरा ग्रामस्थयांचे विशेष सहकार्य लाभले

# परिवर्तन सामाजिक संस्थे मार्फत खांदा कॉलनीत शिवजयंती उत्साहात साजरी



दैनिक युवक आधार

**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : खांदा कॉलनीत परिवर्तन सामाजिक संस्थेमार्फत शिवजयंती उत्सव दरवर्षी प्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात पार पडला यावर्षी खांदा कॉलनीत सेक्टर 8 येथील मैदानात झालेल्या शिवजयंती कार्यक्रमात सीमा पाटील यांचा शाहीरी पोवाडा व संगीतकार जॉनी मोरे यांच्या प्रबोधनात्मक गीताच्या कार्यक्रमानी प्रेक्षकांची मने जिंकली महादेव वाघमारे आपल्या या सामाजिक संस्थेतर्फे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करतात यंदा कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खांदेश्वर पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे मॅडम यांची उपस्थिती होती यावेळी त्यांनी महादेव वाघमारे व त्यांच्या संस्थेचे कौतुक केले याच कार्यक्रमात त्यांनी सायबर गुन्ह्यांमध्ये होत असलेल्या वाडीबद्दल चिंता व्यक्त करून नवी मुंबई पोलीस आयुक्तलया तर्फे सर्व ठिकाणी याविषयी जनजागृती करणयाचे ठरवले असून सर्व सांस्कृतिक कार्यक्रमात याविषयी पोलीस माहिती देतील असा आमचा प्रयत्न राहील असे सांगितले यावेळी त्यांनी व्हॉटसफ व युट्यूबवर नवी पोलीसान तर्फे जनजागृती विषयक पोस्ट टाकल्या आहेत त्याची माहिती घ्या व गुन्हा घडल्यास तात्काळ पोलिस स्टेशनची संपर्क साधा असे आवाहन केले यावेळी त्यांनी सीमा पाटील व कलाकारांचा सत्कार केला या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे पनवेलचे माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील दर्शना भंडागे मॅडम वामन मोरे शेकाप अध्यक्ष जयंत भगत कॉंगेस अध्यक्ष जयवंत देशमुख पोलीस स्टाफ कैलास म्हात्रे इत्यादी मान्यवर

# रुग्ण कल्याणासाठी धडपडणारा घाटंजीचा रुग्णसेवक मनोज हामंद

दैनिक युवक आधार

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर/घाटंजी** - राजकारण म्हटल की डोळ्यासमोर येतो पांढरा शुभ्र शर्ट पैंट,सोशल मिडीयावर वेगवेगळ्या पोजचे फोटो तसेच राजकारणाच्या माध्यमातून वेगवेगळ्या मार्गाने पैसे कमाविने परंतु या सर्वापेक्षा वेगळा व कुठेही प्रसिद्धीच्या झोतात न येता आपले सामाजिक कार्य तथा रात्र बेरात्री रुग्णाच्या मदतीकरिता धावून जाणारा चेहरा व अंत्यत साधी राहणीमान असनारे घाटंजी तील मनोज हामंद मागिल अणेक वर्षापासून भाजपाचे एकनिष्ठ म्हणून त्यांची शहरात ओळख आहे तसेच ते आमदार प्रा.राजुभाऊ तोडसाम यांचे खंदे समर्थक ही आहेत राजकारणाचा वापर दिनदुबळ्या,गरिब तथा रुग्णाच्या मदतीकरिता कसा करायचा याच उत्तम उदाहरण म्हणजे मनोज हामंद शहरातील कोणत्याही प्रकारची समस्या त्यांचे पर्यत घेऊन गेल्यास त्याचे निराकरण करण्याकरिता नेहमी पुढाकार घेतात तसेच रुग्णाच्या मदतीला तर नेहमिच धावून जातात अशी अणेक उदाहरणे आहे. तुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत शहारातील प्रचाराची धूरा खांद्यावर घेत प्रत्येक घर आपल्या सहकार्यासह पिंजून काढले भाजपाचा कोणताही कार्यक्रम आला की तो अंत्यत प्रभावीपणे यशस्वी करण्यातही त्यांचा पुढाकार असतो.कोविड माहामारीत अणेक रुग्णांना मोठ्या प्रमाणात समस्येला तोंड द्यावे लागत होते घाटंजी तून यवतमाळ ला अणेक पेशंटला पाठविण्यात येत होते अश्या वेळी अणेकांना बेड मिळत नव्हते किंवा मेडिसिन सुद्धा मिळविणे कठिण होते तेव्हा सुद्धा अणेकांना यवतमाळ येथे शक्य तेवढी मदत करण्यात घाटंजीतील मनोज हामंद हा चेहरा सर्वांत समोर होता.२०१६ साली घाटंजी न.प.सार्वत्रिक निवडणूक मध्ये त्यांनी भाजपा तर्फे न.प.सदस्याकरिता निवडणूकही लढविली अंत्यत अतातटीच्या या निवडणूकीत फक्त २५ मतांच्या फरकाने पराभव झाला विशेष म्हणजे त्यांनी फक्त कामांवर मत मागितले होते कुठेही दुसऱ्या मार्गाचा वापर केला नाही पराभावातून खचुन न जाता त्यांनी अधिक जोमाने आपले काम सूरु ठेवले न.प. मध्ये नसून सुद्धा प्रभागात कोणती समस्या उद्भवली त्याचे निराकरण करण्याकरिता मनोज हामंद नेहमी समोर दिसतो तसेच घाटंजीतील उत्तम वक्ता म्हणून सुद्धा त्यांचेकडे बघीतले जाते विविध सभेत घाटंजी शहराच्या विकासावर त्यांचे अणेक भाषणे शहरात गाजून आहे नूकतीच विधानसभा निवडणुकीत भाषणा दरम्यान घाटंजी ग्रामिण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालय श्रेवर्धनाची मागणी आ.राजुभाऊ तोडसाम यांचे समोर केली आणि अवघ्या दोन महिण्यात राजुभाऊ तोडसाम यांचे नेतृत्वात घाटंजी तील शिष्टमंडाळाने आरोग्य मंत्री ना.प्रकाश आबिटकर साहेबांची भेट घेऊन घाटंजीला उपजिल्हा रुग्णालयाची मागणी केली त्या शिष्टमंडळातही मनोज हामंद यांचा समावेश होता.



स्व.गोपिनाथ मुंडे साहेब व आर्णी विधानसभेचे आमदार प्रा.राजुभाऊ तोडसाम यांना ते राजकारणातील आपला आदर्श मानतात. घाटंजीचा चेहरा मोहरा बदलवायचा असल्यास येणाऱ्या निवडणुकीत मनोज सारख्या युवकांना घाटंजीकर जनतेने संधी द्यायला हवी अशी नेहमीच शहरात चर्चा असते अश्या एक ना अणेक चांगल्या कारणांमुळे मुळे मनोज हामंद ठरतोय राजकारणातील समाजसेवा करणारे आदर्श व्यक्तीमत्व...

# श्री.छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती नळदुर्ग शहरात जल्लोषात साजरी

दैनिक युवक आधार

**संतोष पुदाले/तुळजापूर धाराशिव** -नळदुर्ग शहरातील सर्व हिंदू बांधव व शिवनेरी तरुण गणेश मंडळाच्या वतीने दि.१८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शिवनेरी मंडळाच्या वतीने भव्य दिव्य मिरवणूक काढून जल्लोषामध्ये साजरी करण्यात आली तसेच दि.१९ फेब्रुवारी रोजी भोई गल्ली येथे माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण भोई समाजाचे सदस्य विलासराव पुदाले उपतालुका प्रमुख सरदरसिंग ठाकूर उपशहर प्रमुख शाम कनकधर या सर्व मान्यवराच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यानंतर भोई समाजाच्या वतीने आलेल्या सर्व मान्यवरांचे सत्कार संतोष पुदाले निरज डुकरे विनोद डुकरे यांच्या हस्ते करण्यात आला व तसेच अहिल्याबाई होळकर चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पद्माकर ( पिंटू ) घोडके धिमाजी घुगे यांच्यावतीने करण्यात आले यावेळी तसेच माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी ब्राह्मण गल्ली येथे आपल्या निवासस्थानी शिव जन्मोत्सव पाळणा महिला मंडळाच्या हस्ते करण्यात आले यावेळी महिलांनी आपल्या भाषणामध्ये शिवाजी महाराजाचे विचार प्रत्येक घराघरांमध्ये पोहचली पाहिजे असे या ठिकाणी सांगण्यात आले तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दुधाने अभिषेक शिवप्रेमीच्या हस्ते करण्यात आले यानंतर सायंकाळी सात वाजता किल्ला गेट येथून मराठा गल्ली येथील शिवशाही तरुण मंडळ व भवानी नगर येथील जगदंबा मित्र मंडळाने मिरवणूक वाद्य वाजवत फटाकेच्या आवाजाने जय भवानी जय शिवाजी जय घोषित मोठ्या प्रमाणात मिरवणूक काढण्यात आले.







# राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघ नाशिक येथून रवाना

दैनिक युवक आधार

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**

**विनोद गायकवाड/नाशिक** -भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या सहावी मिनि सब ज्युनिअर (१४ वर्षाआतिल ) राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा मथुरा येथे होत आहे यामध्ये महाराष्ट्र, मुंबई ,आणि विदर्भ हे संघ सहभाग होत आहे महाराष्ट्रातील तिन्ही संघ भारतीय व महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महा सचिव मिनाक्षी गिरी यांच्या मार्गदर्शना खाली सहभाग घेत आहे राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये सहभाग खेळाडू ,

**महाराष्ट्र वेस्ट,)** उबैद शा , शुभम सूर्यवंशी ,यदनेश पुरे ,यश तुपे , दक्ष गायकवाड , जीवन शेजवळ , आर्यन पटेल ,अर्णव पांचाल , शौर्य चव्हाण , धार्मिन राठोड,यशराज जाधव, नील कांबळे,गणेश गोलार



**(महाराष्ट्र ईस्ट );-** देव पटेल. आव्हेस मलबारी. ध्रुव रोंघे . आर्यन महापती . राज गुडेकर . समर्थ गामने . सार्थक चांदवडकर . अर्जुन मोरे . अंश वर्मा . आरुष पिंपळे ,. हर्ष पाटील , सचिन गोल्हार , सोहम अवताडे , हर्ष अग्रवाल,मुंबई, आदित्य धाकराव, देवेन पटेल , यश काकड ,अथर्व काटे, संग्राम देशमुख,तुषार सुर्वे , शिवम बिंद, गजानन शेंडगे, नैतिक मोहोळ, पियुष कांबळे , खुशाल भामरे ,संग्राम तांबे,**विदर्भ**- आयुष बागुल स्मार्ट, प्रदीप कटिमानी , आर्यन जाधव चिन्मय तावडे ,रुद्र भोसले, वीर पाटील ,ओम शेंडगे,आर्यन श्रीवास्तव , रुद्र शेळके,आयुष लिंगे ,राजवीर गोवेकर , रुद्र कुसळकर महाराष्ट्र गर्ल्स ट्विएशा सावला , स्तुती पुजारी ,धुणी लोढा , ओवी पालशेतकर ,कृत्तिका कृष्णा कुमार,श्रेया ननावरे,तृषिता लोळगे याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र सचिव मीनाक्षी गिरी ,महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी ,महाराष्ट्र वुमन डायरेक्टर धनश्री गिरी , जिल्हा सचिव विलास गायकवाड, यांनी सर्वांनी विद्यार्थ्यांचा अभिनंदन केलं व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या महाराष्ट्र मार्गदर्शक म्हणून महेश मिश्रा , सोमा बिरादार मुंबई मार्गदर्शक दर्शन थोरात, विदर्भ मार्गदर्शक मानस पाटील,व्यवस्थापक म्हणून ऋतुजा तोरडमल, रोहिणी सकटे अक्षय आरडे,यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.